RNI NO. MAHMAR/25/A3029

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४५

दि. ०६ जून २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## जीवाच्यावाडीच्या ऊसतोड मजुरांच्या चार मुलीं मुंबईच्या पोलीस दलात

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील बालाघाटच्या डोंगरपट्ट्यातील अतिशय दुर्गम व डोंगरी भागात असलेल्या जीवाचीवाडी येथील एका ऊसतोड मजूराच्या कुटुंबातील चारही मुलींनी महाराष्ट्र पोलीस दलात नियुक्ती मिळवून मुंबई पोलीस दलात आपल्या कामाचा ठसा उमटवीला आहे...

जिद्द,आणि परिश्रमाच्या जोरावर या चारही बहिणींनी यशाचे शिखर गाठले आहे. हनुमंत चौरे यांच्या उषा, अर्चना, शितल, आणि गीतांजली या चारही बहिणींनी जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर यशाचे शिखर गाठले. त्यांनी केलेल्या संघर्षामुळे चौघीचीही महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्यामुळे पंचक्रोशीतील नातेवाईकां नातेवाईक आणि नागरिकांतून त्यांचे कौतुक होत आहे.

जीवाचीवाडी सारख्या खेडे गावातुन अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत व पश्रि्चम महाराष्ट्रातील साखर कारखान्यावर ऊसतोड मजूर म्हणुन काम करणाऱ्या हनुमंत चौरे यांनी आपल्या पत्नीसह ऊसतोडुन आपल्या चार मुलींसह दोन मुलांनाही शिकविले.ऊसतोड मजूर म्हणुन कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. मुली शिकल्या पाहिजेत आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत हा ध्यास घेऊन त्यांनी मेहनत घेतली.



चारही बहिणींनी आपले पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण जीवाचीवाडी येथेच पूर्ण केले. ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा, आर्थिक अडचणी आणि अनेक संकटांचा सामना करत त्यांनी शिक्षण सुरू ठेवले. शिक्षणासोबतच पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न त्यांनी मुलींच्या मनात रुजविले.

पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी त्यांनी चारही मुलींना अंबाजोगाई येथील ज्ञानदीप अकॅडमी, मध्ये प्रवेश घेतला. कठोर सराव, नियमित अभ्यास, शारीरिक चाचण्यांसाठी घेतलेले विषेश परिश्रम आणि स्वतःवरील विश्र्वासाच्या बळावर त्यांनी पोलीस भरतीची तयारी यशस्वीपणे पूर्ण केली.

दोन मुली यापूर्वीच मुंबई येथील पोलीस दलात कार्यरत असतानाच छोट्या दोन बहिणींनीही महाराष्ट्र पोलीस दलात स्थान मिळविले. एका कुटुंबातील चारही मुली एकाच वेळी पोलीस दलात कार्यरत होणे ही जीवाचीवाडीसह तालुक्यातील अभिमानास्पद बाब आहे. या यशामुळे जीवाचीवाडी गावासह संपूर्ण केज तालुक्याच्या शिरपेचात त्यांनी मानाचा तुरा खोवला आहे.

**परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन मिळाले तर यश मिळवता येते, हे आम्ही चौघी बहिणींनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.अशी माहिती उषा चौरे यांनी बोलताना दिली.**

### आई-वडिलांचे मनोगत..

आम्ही ऊसतोड मजूर म्हणुन आयुष्यभर कष्ट आणि परिश्रम केले, पण मुलींच्या शिक्षणाचा निर्धार कधीच सोडला नाही. अनेक अडचणी व आर्थिक संकटे आली, तरी मुलींनीही हार मानली नाही. आज आमच्या चारही मुली मुंबई पोलीस दलात कार्यरत झाल्या आहेत . यापेक्षा मोठा आनंद आमच्यासाठी दुसरा कोणताही नाही. मुलींनी केलेल्या मेहनतीचे हे फळ आहे.अशी भावना आई वडिलांनी बोलताना व्यक्त केली.

### चारही बहिणींचा संदेश..

यशासाठी परिस्थिती नव्हे तर जिद्द महत्त्वाची असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आणि मुलींनी मोठी स्वप्ने पाहावीत. सातत्याने मेहनत घेतली तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. ऊसतोड मजुरांच्या घरातून महाराष्ट्र पोलीस दलापर्यंतचा हा प्रवास म्हणजे संघर्ष, जिद्द, कष्ट आणि यशाची प्रेरणादायी गाथा आहे.अशी भावना चारही बहिणींनी बोलताना केली.

## प्रारुप विकास आराखड्याबाबत सूचना करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने लातूर शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. या संदर्भात नागरिकांच्या काही अपेक्षा व सूचना असतील तर त्या कळविण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मनपाच्या सर्वसाधारण सभेने २०२३ मध्ये प्रारूप विकास योजना तयार करण्यास मान्यता दिलेली आहे. ही योजना तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या आराखड्याबाबत शहर व परिसरातील स्थानिक नागरिक, व्यावसायिक,मालमत्ताधारक, विकसक व काही विभागांना सूचना करावयाच्या असतील तर त्यांच्यासाठी ही संधी आहे.शहराची खरीखुरी गरज काय आहे? हे या माध्यमातून कळू शकते.

अशी माहिती संकलित करणे, सार्वजनिक कारणांसाठी लागणारी नवीन आरक्षणे, पाणीपुरवठा, ड्रेनेज,स्मशानभूमी, दुकाने, नवीन रस्ते व भविष्यातील अपेक्षित सोयी- सुविधा या संदर्भातील प्रश्नावली दि. ८ जून रोजी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांनी या संदर्भातील आपले मत व सूचना लेखी प्रश्नावली मध्ये भरून नगर रचना विभाग येथे दि. ९ व १० जून पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये दाखल करावयाच्या आहेत. या सूचनामुळे प्रारूप विकास आराखडा सर्वसमावेशक व लोकाभिमुख पद्धतीने तयार करता येणार आहे.

नागरिकांनी आपल्या सूचना कळवाव्यात, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## सरसमता फाऊंडेशनच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** समता फाऊंडेशन, लातूर ही संस्था गेल्या दोन वर्षांपासून समाजातील शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहे. वीटभट्टी कामगारांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले तसेच कौटुंबिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर जाणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्था करत आहे. समता फाऊंडेशनच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांसह रक्तदान शिबिराचे आयोजन संजीवनी ब्लड सेंटर येथे करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रशांत राजश्री प्रभाकर सुरवसे, सचिव अमोल गवळी तसेच मंथन राठोड, अजिंक्य आष्टे, मानसी साबळे, दत्ता धुमाळ, राहेल शिरसाठ आणि विजय सुरवसे यांनी रक्तदान करून वर्धापन दिनाची शोभा वाढवली.

समाजातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. समता फाऊंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## एमपीएससीच्या अंतिम निवडीत हुकलेल्या उमेदवारांना 'निपुण सेतू'द्वारे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या गुणवंत उमेदवारांसाठी आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. अशा उमेदवारांना खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभागामार्फत 'मैत्री २.०' पोर्टल अंतर्गत 'निपुण सेतू' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) 'प्रतिभा सेतू' या उपक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'निपुण सेतू' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत मजल मारलेल्या अनेक उमेदवारांकडे उच्च शैक्षणिक पात्रता, विश्लेषण क्षमता, नेतृत्वगुण आणि प्रशासकीय कौशल्ये असूनही मर्यादित पदसंख्येमुळे त्यांना संधी मिळत नाही. या गुणवंत मनुष्यबळाचा उपयोग राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत एमपीएससीच्या कोणत्याही परीक्षेतील मुलाखत, कौशल्य चाचणी किंवा शारीरिक चाचणी यासारख्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या, मात्र अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. शासन निर्णयानंतर आयोजित होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी हा उपक्रम लागू राहणार असून, मागील एका वर्षातील पात्र उमेदवारांची माहितीही त्यांच्या संमतीनंतर आणि तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास पोर्टलवर समाविष्ट करण्यात येणार आहे.

## भारतात ५ गिगावॅट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी ३० अब्ज डॉलरची गुंतवणूक

नवी दिल्ली : ब्लॅकस्टोन समर्थित डेटा सेंटर कंपनी एअरट्रंक भारतात २०३० पर्यत ५ गिगावॅटपेक्षा अधिक क्षमतेचं डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करणार आहे. यासाठी कंपनीनं भारतात ३० अब्ज अमेरिकन डॉलर (सुमारे ३ लाख कोटी रुपये) गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. ही गुंतवणूक देशातील डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रातील सर्वात मोठ्या उपक्रमांपैकी एक ठरणार आहे. एअरट्रंक कंपनीनं दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार, ही योजना ब्लॅकस्टोन आणि कॅनडा पेन्शन प्लॅन इन्व्हेस्टमेंट बोर्ड (सीपीपीआयबी) यांच्या पाठिंब्यानं राबवली जाणार आहे.

कंपनीनं एप्रिल २०२६ मध्ये ल्युमिना क्लाउडइन्फ्रा कंपनीच्या खरेदीद्वारे भारतात प्रवेश केला होता. या व्यवहारामुळं मुंबई, चेन्नई आणि हैदराबाद येथे ६०० मेगावॅट क्षमतेचा प्रारंभिक विकास योजना सुरू केलीय. एअरट्रंकचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रॉबिन खुदा यांनी भारतात प्रवेश केल्यानंतर महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशच्या राज्य मंत्र्यासह केंद्र सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. या भेटीगाठींमध्ये एआय-चालित वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा, पाणी पुरवठा, पर्यावरणस्नेही उपाय, जलद मंजुरी प्रक्रिया आणि केंद्र-राज्य समन्वय यावर भर देण्यात आला.

## परराज्यातील प्रवासी बस क्रमांक एआर-२० डी-३७८६ वरील महाराष्ट्र राज्याचा परवाना नसणे, कर व इतर बाबतीत दंडात्मक कारवाई केलेली असताना लाच मागितली अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झालेल्याबाबत खुलासा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील प्रवासी बसवर दंडात्मक कारवाई करताना परिवहन विभागाच्या पथकाने लाच मागितल्याची सोशल मीडिया आणि काही वृत्त माध्यमांमध्ये प्रसारित झालेली बातमी चुकीची, दिशाभूल करणारी असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे. ४ जून २०२६ रोजी सकाळी ८:३९ वाजता परराज्यातील नोंदणी असलेल्या एआर-२०-डी-३७८६ या खासगी प्रवासी बसवर महाराष्ट्र राज्याचा परवाना नसणे, कर न भरणे आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करून ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. तपासणी दरम्यान पथकाने लाच मागितल्याचा दावा निराधार असून, संबंधित वाहनधारकाने दंडाची ही सर्व रक्कम ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे जमा केली आहे.

या वाहनावर यापूर्वीही ७ एप्रिल २०२६ रोजी ३ हजार ६५० रुपये, १३ मे २०२६ रोजी ३ हजार रुपये आणि १९ मे २०२६ रोजी ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता, जो वाहनधारकाने नियमानुसार ऑनलाईन भरला आहे. या प्रकरणाबाबत चुकीची माहिती पसरवून विभागाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित वाहन चालकावर लातूर (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## दुष्काळाच्या शक्यतेने शेतकरी हवालदिल

पुणे : 'एल निनो'च्या शक्यतेमुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या उपाययोजना, त्यांची अंमलबजावणी आणि सर्वसमावेशक मदतीची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. 'शिवार फाउंडेशन'तर्फे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तयार करण्यात आलेल्या हेल्पलाइनवर येणाऱ्या 'कॉल'च्या विषणात शेतकऱ्यांची ही चिंता व्यक्त झाली आहे. सहा महिन्यांपूर्वीच महापुराचा फटका, आता दुष्काळाची शक्यता, यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, मदतीसाठी संपर्क करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे निरीक्षण शिवार फाउंडेशनकडून नोंदविण्यात आले. गेल्या चार महिन्यात 'शिवार हेल्पलाइन'वर संपर्क करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये ६२ टक्क्यांनी वाढ झाली असून, एप्रिल महिन्यात १ हजार ५९८ शेतकऱ्यांनी मदतीसाठी संपर्क केला आहे. जानेवारी महिन्यात ही संख्या ९८२ इतकी होती. तर फेब्रुवारी महिन्यात १ हजार १९५, मार्चमध्ये १ हजार २७६ शेतकऱ्यांनी दुष्काळाबद्दल चिंता व्यक्त केल्याची माहिती 'फाउंडेशन'कडून देण्यात आली. 'शिवार फाउंडेशन'चे प्रमुख विनायक हेगाना म्हणाले, 'काही भागांत अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांना नुकतेच झोडपले. त्यामुळे अजूनही आर्थिक घडी विस्कळीत आहे. त्यात 'एल निनो'मुळे निर्माण झालेली दुष्काळाची शक्यता शेतकऱ्यांना आर्थिक, सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या खचवणारी आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; दुचाकी व मालवाहू वाहन चोरी प्रकरणातील आरोपी अटक, १ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात वाहन चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक लातूर श्री अमोल तांबे यांच्या आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत वाहन चोरीच्या दोन गुन्ह्यांतील आरोपीस अटक करून एकूण १ लाख २० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

दिनांक ०४ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथकाकडून वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना माहितीदारामार्फत कातपूर रोडवर एक संशयित इसम टाटा एसीई एक्सएल मालवाहू वाहनासह थांबलेला असल्याची माहिती प्राप्त झाली.

माहितीची खातरजमा करून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. तेथे एक इसम टाटा कंपनीचे TATA ACE XL मालवाहू वाहन (क्र. MH-01-CR-7583) घेऊन संशयास्पदरीत्या उभा असल्याचे आढळून आले. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव १) अकबर सत्तार शेख (वय ३० वर्षे, रा. आष्टा, ता. चाकूर, जि. लातूर) असे सांगितले.

सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये नंबर प्लेट नसलेली काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल आढळून आली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने संबंधित मोटारसायकल ही लातूर शहरातील संजयनगर परिसरातून तर TATA ACE XL मालवाहू वाहन हे किल्लारी परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली.



त्यानंतर लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या अभिलेखांची पडताळणी केली असता मोटारसायकल चोरीप्रकरणी पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गुरनं. ४०९/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल असल्याचे तसेच मालवाहू वाहन चोरीप्रकरणी पोलीस ठाणे किल्लारी येथे गुरनं. १७६/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

सदर कारवाईत हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (काळ्या रंगाची) - किंमत अंदाजे ४०,०००/-TATA ACE XL मालवाहू वाहन - किंमत अंदाजे ८०,०००/-असा एकूण १,२०,०००/- (एक लाख वीस हजार रुपये) किंमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी अकबर सत्तार शेख यास ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे हजर करण्यात आले आहे. तसेच चोरीच्या इतर गुन्ह्यांबाबत त्याच्याकडे अधिक तपास सुरू असून अकबर शेख पोलीस ठाणे किल्लारी येथील एका गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी आहे.

ही उल्लेखनीय कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकामधील पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोउपनि अमर केंद्रे, सफौ सर्जे राव जगताप, प्रदीप स्वामी, मोहन सुरवसे,राजेश कंचे, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, गोविंद भोसले यांनी पार पाडली.

## संपादकीय...

### तृणमूल काँग्रेस :पराभवानंतर पक्षाती असंतोष

तृणमूल काँग्रेसच्या २८ वर्षांच्या राजकीय इतिहासातील सर्वात मोठे वादळ अखेर अधिकृत फुटीच्या रूपाने समोर आले. ही ऐतिहासिक फूट पश्चिम बंगालसह राष्ट्रीय राजकारणाला कलाटणी देणारी ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षात धुमसत असलेल्या असंतोषाची ही परिणती आहे. पक्षाच्या ८० आमदारांपैकी तब्बल ५८ बंडखोर आमदारांनी ममता बॅनर्जी यांच्या पसंतीला बाजूला सारून ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड केली. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि ममतांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या एकतर्फी आणि कॉर्पोरेट कार्यपद्धती विरोधातील हे बंड आहे. या गटाने विधानसभेतील अपयशासाठी थेट सर्वोच्च नेतृत्वाच्या राजकीय रणनीतीला जबाबदार धरले. पराभूत मानसिकतेतून बाहेर पडण्याऐवजी पक्षात अंतर्गत चिखलफेक सुरू झाली आणि पुढे याचे रूपांतर बंडामध्ये झाले. बंडखोर आमदारांनी ममतांबद्दल आदर कायम ठेवत अभिषेक यांच्या अहंकारी वर्तनावर टीका करत थेट पक्षावरच दावा ठोकला. मध्यंतरी तृणमूलच्या एका खासदारांनी आगामी दोन वर्षांत पक्ष संपण्याची भीती व्यक्त केली होती. एक दशकाहून अधिक काळ ममतांचे राजकीय वर्चस्व अबाधित होते. झुंजार नेत्या ही त्यांची प्रतिमा पक्षाच्या यशाचा मुख्य पाया होती. परंतु, घर फिरले की वासे फिरतात, या उक्तीनुसार विधानसभेतील पराभवाने पक्षाच्या वर्षानुवर्षे लपलेल्या कमकुवत बाजू चव्हाट्यावर आणल्या. खासकरून अभिषेक यांच्याबद्दलचे 'अंधप्रेम' पक्षाला आतून पोखरत चालले होते. या अंतर्गत वादात ठिणगी टाकण्याचे काम विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीने केले. पक्षनेतृत्वाने ज्येष्ठ नेते सोभनदेव चट्टोपाध्याय यांची शिफारस करणारे पत्र पाठवले. मात्र, आ. ऋतब्रत बॅनर्जी आणि सांदिपन साहा यांनी या पत्रावर आपल्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचा खळबळजनक आरोप केला. यामुळे पक्षाची प्रतिमा धुळीला मिळाली. आरोप करणाऱ्या आमदारांना पक्षविरोधी कारवायांचे लेबल लावून बडतर्फ केले गेले. या हुकूमशाही पद्धतीमुळे आमदारांमधील संताप अनावर झाला. परिणामी ममतांनी बोलावलेल्या बैठकीवर तब्बल ६० आमदारांनी बहिष्कार टाकला. तिथेच नेतृत्वाची पक्षावरील पकड सैल झाल्याचे स्पष्ट झाले. अखेर ५८ बंडखोर आमदारांनी हकालपट्टी झालेले नेते ऋतब्रत बॅनर्जी यांना विधिमंडळ दलाचे नेते म्हणून पाठिंबा देणारी पत्रे विधानसभा अध्यक्षांकडे सुपूर्द केली. त्यांनी मंजुरी देताच तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे अधिकृतपणे दोन गटांत विभाजन झाले. विधिमंडळातील बहुमताचे नियंत्रण बंडखोरांच्या हातात गेल्यामुळे ममता आणि अभिषेक यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. सध्या दोन्ही गट ममता बॅनर्जी यांच्या नावाचा आणि प्रतिमेचा वापर करत आहेत. परंतु पडद्यामागील खरा संघर्ष तृणमूल काँग्रेसचे भविष्य नेमके कोणाच्या हातात असणार, यावरूनच सुरू आहे. पक्षातून फुटणाऱ्या गटाला मान्यता मिळवण्यासाठी दोन तृतीयांश म्हणजेच ८० पैकी ५४ आमदारांची गरज आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांच्यासोबत ५८ आमदार असल्याने अपात्रतेची अडचण येण्याची शक्यता दिसत नाही. पण महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर जशी न्यायालयीन लढाई सुरू झाली, तशीच बंगालमध्ये सुरू होणार हे निश्चित. येणारा काळ ममता बॅनर्जी यांच्यासाठी कसोटीचा असणार आहे. ज्या नेत्यांनी पक्षाला तळागाळातून उभे केले, त्यांना डावलून निर्णय घेतले जातात, तेव्हा असा स्फोट होतो. कोलकाता महापालिकेचे महापौर, तृणमूलचे नेते फिरहाद हाकीम यांचा राजीनामा हा ममतांसाठी मोठा धक्का आहे. ममतांच्या जहाजाला लागलेली गळती त्यांच्या सर्वात विश्वासू सहकाऱ्यांपर्यंत पोहोचली आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांचा गट पक्षचिन्हावर दावा करेल, तेव्हा ममतांसमोर स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व वाचवण्याचे आव्हान असेल. त्यांनी तातडीने इंडिया आघाडीची बैठक बोलावण्याची मागणी केली. परंतु, प. बंगालमध्ये ज्या काँग्रेस आणि डाव्या पक्षांसोबत तृणमूलचा स्थानिक पातळीवर छत्तीसचा आकडा राहिला, ते पक्ष दीदींना वाचवण्यासाठी कितपत पुढे येतील, हा मोठा प्रश्न आहे. कारण राजकारणात सहानुभूतीला स्थान नसते, तिथे केवळ संख्याबळाचा आदर केला जातो. भारतातील प्रादेशिक पक्षांचे भवितव्य अधिक गडद होत चालले आहे, ही बाब बंगालमधील बंडाने स्पष्ट केली. विरोधक या घडामोडींचे खापर भाजपवर फोडत असले तरी प्रत्यक्षात वैयक्तिक राजकीय महत्त्वाकांक्षा हे याचे मूळ कारण आहे. वर्षानुवर्षे एखाद्या कंपनीप्रमाणे पक्षाची मालकी आपल्या दावणीला बांधताना कार्यकर्ते-नेत्यांच्या वाढत्या आकांक्षांकडे, भूमिकांकडे दुर्लक्ष होत राहिल्यामुळे अशी फूट पडण्यास जागा तयार होते. शिवसेना, राष्ट्रवादी, तृणमूलच्या घटनांमध्ये एक समान धागा दिसतो, तो म्हणजे या तिन्ही पक्षनेतृत्वांना पक्षातील धुसफूस वाढत चालल्याचा इशारा निकटवर्तीयांनी दिला होता. अशा वेळी चाणाक्षपणा दाखवत पक्षांतर्गत असंतोष शांत करण्याचे कौशल्य नेतृत्वाने दाखवणे गरजेचे असते. त्याऐवजी आपल्याच म्हणण्यावर अडून राहण्याची हटवादी भूमिका घातक ठरते, हा या प्रकरणांचा संदेश आहे. समाजशास्त्राचे अभ्यासक मॅक्स वेबर यांच्या मते, राजकीय पक्षांचे अस्तित्व हे प्रामुख्याने तीन प्रकारच्या अधिकारांवर टिकून असते. घराणेशाही, तर्कसंगत निर्णय आणि करिष्मा. जे राजकीय पक्ष केवळ करिष्मा किंवा घराणेशाही अधिकारावर चालतात, ते तात्पुरते यशस्वी झाले तरी दीर्घकाळ टिकू शकत नाहीत. पक्षाचे अस्तित्व कायम राखण्यासाठी त्याला तर्कसंगत कायदेशीर स्वरूप देणे म्हणजेच पक्षात लोकशाही नियम, घटना आणि संस्थात्मक चौकट तयार करणे अत्यंत आवश्यक असते. भारतातील बहुतांश प्रादेशिक पक्ष हे एका विशिष्ट नेत्याच्या वैयक्तिक करिष्म्यावर उभे राहिलेले आहेत. या पक्षांमध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्णपणे एकाच व्यक्तीभोवती केंद्रित असते. जोपर्यंत करिष्मा असणारा हा नेता सक्रिय असतो, तोपर्यंत पक्ष एकसंध राहतो. परंतु, त्याच्या राजकीय प्रभावाला मर्यादा येतात, ओहोटी लागते तेव्हा पक्षाला संस्थात्मक स्वरूप न दिल्याचा फटका बसतो. तृणमूल काँग्रेसने पक्षामध्ये लोकशाही मार्गाने निर्णय घेतले जातील अशी कोणतीही संस्थात्मक साखळी तयार केली नाही. सत्तेचे कोंदण असेपर्यंत सारे सुरळीत सुरू राहिले; पण सत्तेचा आधार नाहीसा झाल्याबरोबर संपूर्ण संघटना पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली.

# वाशी येथे धर्मांतर विरोधी कायदा, उपवर्गीकरण व बौद्ध जनगणना परिसंवाद सोहळा यशस्वीरित्या संपन्न

## आपले अस्तित्व आणि संविधानात्मक अधिकार टिकवण्याची हीच खरी वेळ! जात धर्म देव्हाऱ्याचा नाद नको आता बौद्ध म्हणूनी ओळख आपली घडवूया आता- डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा पुरुष व महिला शाखा आणि बुद्ध प्रतिष्ठाण (अशोक बॅंकवेट हॉल) वाशी नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मांतर विरोधी कायदा, उपवर्गीकरण व बौद्ध जनगणना कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक: ३१/०५/ २०२६ रोजी अशोका बँक्वेट हॉल बुद्ध प्रतिष्ठाण वाशी नवी मुंबई येथे करण्यात आले. बुद्ध प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. अनंत हर्षवर्धन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सर्वप्रथम उपस्थित प्रमुख अतिथी डॉ . भीमराव यशवंतराव आंबेडकर, मान. उत्तमराव खोब्रागडे ( ख-ड ), एच. बी. तायडे, प्रशांत गडकरी ( कोषाध्यक्ष - महाराष्ट्र, बापु निकाळजे ( कार्यालयीन सचिव - महाराष्ट्र ) व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष विजय झनके गुरुजी व शोभाताई कांबळे ( महिला - जिल्हाध्यक्ष ) यांच्या उपस्थितीत आदर्शांची पुजा करण्यात आली. सामुहिक त्रिसरण घेण्यात आले. समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियनचे मेजर जनरल मधुकर हिवराळे आणि इतर बटालियनने मान्यवरांनी कडक निळी सलामी दिली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत बुद्ध प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. अनंत हर्षवर्धन यांनी केले. प्रास्ताविक विजय झनके गुरुजी ( जिल्हाध्यक्ष - नवी मुंबई ) यांनी केले. विजय झनके गुरुजींनी धर्मांतर विरोधी कायदा उपवर्गीकरण व बौद्ध जणगणना परिसंवाद सोहळा या संदर्भातील कार्यक्रम घेण्याबद्दलची पार्श्र्वभुमी सांगीतली. प्रास्ताविक विचार व्यक्त केले. तसेच एच. बी. तायडे



( माजी सचिव - मंत्रालय ) यांनी आपले चांगले विचार व्यक्त केले. मान. उत्तमराव खोब्रागडे ( माजी सेवानिवृत्त प्रशासकीय IAS अधिकारी ) तद्वतच सल्लागार ऑल इंडिया बॅकवर्ड क्लासेस एम्लॉईज फेडरेशन (आयबीसेफ ) यांचे अप्रतिम मार्गदर्शन झाले. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विद्वतेने जी जागतिक क्रांती केली. जो संघर्ष केला. त्यांचा आदर्श घेवुन आपण शिकुन प्रशासकीय सेवेत गेले पाहीजे. चांगले अधिकारी झाल्यानंतर कायदे वाकवुन आपण समाजाला न्याय देवु शकतो. एकजुटीने राहुन आपले आरक्षण टिकवुन आपल्या विद्वतेने मेहनतीने व चिकाटीने सर्व स्तरांमध्ये आपण जोमाने पुढे येवुन प्रगती केली पाहीजे. असे विधान व्यक्त करून शासनाच्या सेवेत राहुन समाजासाठी त्यांनी म्हाडा, बेस्ट व इतर अनेक विभागामध्ये केलेले कार्य सांगीतले जबाबदारीने एकनिष्ठेने कार्य करून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असतांना पारदर्शक काम केले. चांगली कामे करून शासनाचा फायदा केला. समाजाची चांगली सेवा केली. सेवा करीत असतांना दुजाभाव न करता सर्वांना न्याय दिला. विद्वतेच्या जोरावर इमानदारीने कार्य केले तर आपण समाजाला न्याय देवु शकतो असे अप्रतिम मार्गदर्शन केले. तद्नंतर भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ . भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी धर्मांतर विरोधी कायदा उपवर्गीकरण व बौद्ध जनगणना परिसंवादामध्ये गरज नसतांना सरकारने वर्गीकरणाचा विषय सुरु केला. समाजामध्ये वाद निर्माण करण्याचे काम केले, आपले सामाजिक, आर्थिक शैक्षणिक व राजकीय आरक्षण वाचवुन जातीय जणगणनेची योग्य माहीती सरकारला द्या..! असा संदेश दिला. या जातीवाचक सरकारला नमविण्यासाठी सर्वांनी संघटीत होवुन कडाडुन विरोध करून आपले आरक्षण वाचविण्यासाठी सर्वांनी कटीबद्ध असले पाहीजे आपले अस्तित्व आणि संविधानात्मक अधिकार टिकवण्याची हीच खरी वेळ आहे असे मत डॉ . भीमराव आंबेडकरांनी व्यक्त केले. नागपुरची दिक्षा भुमी, बौद्धांच्या अस्मितेचे केंद्र महाबोधी महाविहार आपल्या ताब्यात घेतल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, हा लढा अधिक जोमाने लढत राहु जात धर्म देव्हार्याचा नाद नको आता बौद्ध म्हणूनी ओळखली आपली घडवूया आता..! असे प्रभावशाली उर्जात्मक मार्गदर्शन करून न्याय हक्कांसाठी लढण्यासाठी सर्वांमध्ये भरीव उर्जा निर्माण केली. मान. उत्तमराव खोब्रागडे साहेब यांना ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना भरीव शुभेच्छा दिल्या. डॉ. अनंत हर्षवर्धन यांनी चांगले अध्यक्षीय विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष यु .जी. बोराडे गुरुजी, प्रशांत गडकरी ( कोषाध्यक्ष - महाराष्ट्र ), बापु वाघमारे ( कार्यालयीन सचिव महाराष्ट्र ), महादेव गायकवाड ( पर्यटन सचिव - मुंबई प्रदेश ), प्रामुख्याने उपस्थित होते. उत्तमराव खोब्रागडे साहेब ( सेवानिवृत्त ख-ड अधिकारी ) व सल्लागार ऑल इंडिया बॅकवर्ड क्लासेस एम्लॉईज फेडरेशन यांच्या ७५ व्या वर्ष पुर्तिनिमित्त अभिष्टचिंतन सोहळा सुद्धा केक कापुन त्यांना भरीव शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन : सिध्दार्थ साळवे गुरुजी यांनी केले. आभारप्रदर्शन ज्योतीताई जाधव (सरचिटणीस - महिला शाखा नवी मुंबई जिल्हा यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विजय झनके (जिल्हाध्यक्ष), शोभाताई कांबळे (महिला जिल्हाध्यक्ष), संजय झनके (सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा), प्रकाश माने (कोषाध्यक्ष - नवी मुंबई जिल्हा ) प्रकाश भालेराव (उपाध्यक्ष - संस्कार) राजश्रीताई पारधे (पर्यटन सचिव), मधुकर साळवे (सरचिटणीस - बुद्ध प्रतिष्ठाण), छायाताई दिवे (कोषाध्यक्ष- महिला जिल्हा कार्यकारिणी), अनितााताई अहिरे, मायाताई मनवर, प्राचीताई जाधव सुलोचनाताई माघाडे, सुनिताताई हराळ, दत्तात्रय हराळ, देव प्रधान, दत्ताश्रेय भालेराव, अजय माळवे, मधुकर हिवराळे, दिपक कांबळे कविताताई कांबळे, सुरेखाताई सावंत, कल्पनाताई कांबळे, मनिषाताई गंगावणे, दगडु पाईकराव संपुर्ण नवी मुंबई जिल्हा पुरुष व महिला कार्यकारिणी त्याचप्रमाणे बुद्ध प्रतिष्ठाणचे संपुर्ण पदाधिकारी नवी मुंबई जिल्हाअंतर्गत शहर व वार्ड शाखांचे पदाधिकारी केंद्रिय शिक्षक / शिक्षिका बौध्दाचार्य / बौध्दाचार्या सैनिक उपासक आणि उपासिका सर्वांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले. एस न्यूज युट्युब चॅनेल पत्रकार : रवि ढवळे, दैनिक महावृत्त पत्रकार : कल्याणराव हनवते, मुंबई दुरदर्शन मराठी ॑ सहयाद्री वाहिणी सहाय्यक निर्माता : संजय झनके प्रामुख्याने उपस्थित होते. सरते शेवटी राष्ट्रगित व सरणत्तय गाथा घेवुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# अल्कोहोलिक्स नॉनिमस (अनामिक मद्यपी) संघटनेस १० जून २०२६ रोजी ९१ वर्षे पूर्ण होत असून ९२ व्या वर्षात पदार्पण होणार आहे

( संकलन : सुनील आय.)

: अल्कोहोलिक्स नॉनिमस अर्थात ए.ए.(अनामिक मद्यपी )संघटना ही विश्र्वव्यापी बंधुत्व निर्माण करणारी संघटना असून दारू या जटील समस्येवर दारूमुक्तीसाठी विनामूल्य मदत करीतआहे.ए.ए.ही संघटना राजकारण,समाजकारण आणि धार्मिकता यापासून दूर असून जात,पात,धर्म,उच्च नीच असा कोणताही भेदभाव करीत नाही.स्वावलंबनाच्या तत्वावर ए.ए.विश्र्वभरात१८०पेक्षा जास्त देशांमध्ये सुमारे १,५०,००० समूहांद्वारे ४०लाखांपेक्षा अधिक मद्यासक्तांना दारूपासून दूर ठेवण्यात सहाय्यभूत ठरलेली आहे.१०जून १९३५ रोजी ए.ए.संघटनेच्या विचारसरणीचा जन्म अमेरिकेत झालेला असून भारतामध्ये ५ मे १९५७ रोजी या कार्याची सुरुवात झालेली आहे.या भातृभाव संस्थेच्या निर्मितीचा इतिहास आपण जाणून घेऊ या.... अतिमद्यपानाच्या समस्येने त्रस्त असलेले रोलॅन्ड मद्यपी अमेरिकेतील स्विझरलँड येथे डॉ.कार्ल ह्युंग मानसोपचारतज्ज्ञ यांचेकडे उपचार घेत होते.परंतु ते वारंवार दारूकडे वळत असल्याने निराशेच्या गर्तेत सापडले होते. त्यावेळी डॉ. ह्युंग यांनी त्यांना सल्ला दिला होता की,मद्यमुक्ती आणि निराशेतून बाहेर पडण्यासाठी स्वतःला एखाद्या धार्मिक वातावरणात गुंतवून घेऊन उच्च शक्तीवर जीवन सोपवून द्यावे.तोच मार्ग तुम्हांला उपयोगी पडेल.यातून मानवी शक्तीपेक्षा उच्चशक्तीचा भरवसा दिला गेला होता.परिणामी मानवी अहंकाराचे अवमूल्यन हे ए . ए.संघटनेचे मुख्यसूत्र ठरले. त्यावेळी रोलँडने ऑक्सफर्ड या धार्मिक समुहामध्ये स्वतःला गुंतवलं आणि मद्यमुक्ती प्राप्त केली. १९३२ ते १९३४ या काळात बऱ्याच मद्यपींना या समूहाचा लाभ मिळालेला होता. रोलँड यांनी एबी टी.यांना देखील याच समूहाद्वारे मद्य मुक्तीसाठी मदत केलेली होती.समदुःखी एकदुसऱ्याला समस्या निराकरणासाठी सहाय्यभूत ठरू शकतात ह्या उपायाचे दुसरे सूत्र जन्माला आले होते.पुढे हाच संदेश एबी टी.आपल्या बालपणाचे मित्र बिल डब्लू यांना देतात. पण बिल डब्लू विज्ञानवादी असल्याने त्यांना हा संदेश मान्य करणेअवघड गेले होते.१९३४ च्या उन्हाळ्यात बिल डब्लू डॉ.सिल्कवर्थ मानसोपचारतज्ज्ञ यांचेकडे उपचार घेत असतांना त्यांनी मद्यपीला मानसिक सक्तीचे दडपण आणि शरीराला दारूचे वावडे (लर्जी ) असा मद्यपाश आजार याबद्दलची स्पष्ट कल्पना बिल डब्लूनां दिलेली होती.यातून मद्यपाशापुढे विज्ञानाची हतबलता ही बाब बिल यांच्या लक्षात आल्यानंतर दारूने त्यांचा केलेला पराभव आणि नैराश्य यामुळे बिल यांना एबी टी. यांनी सुचविलेला संदेश ऐकण्याच्या मनःस्थितीत आणून सोडले. नोव्हेंबर १९३४ मध्ये एबी. टी.




बिल यांच्या घरी भेटायला येतात तेंव्हा बिल त्या मित्राला दारू पिण्याची ऑफर देतात.पण एबी टी. नम्रपणे नकार देतात. हे पाहून बिल आश्र्चर्यचकित होतात.एबी टी.पुन्हा त्यांना धार्मिक समूहाची तत्वे कथन करतात.त्यामध्ये दारूपुढे शरणागती, स्वतःशी प्रामाणिकता आणि आत्मशोध,दोषांची कबुली,क्षमा व नुकसान भरपाई,इतरांना विनामूल्य मदत आणि ईश्र्वराबद्दल चिंतन.ह्या तत्वांच्या श्रवणाने बिल त्यावेळी अस्वस्थ होतात.आणि ही तत्वं आपण स्वतः आचरणात आणून पाहण्यास काय हरकत आहे ? असा विचार त्यांच्या मनामध्ये डोकावतो.त्याच दरम्यान बिल डब्लू डिसेंबर १९३४ मध्ये न्यूयॉर्कच्या चार्ल्स बी टाऊन हॉस्पिटलमध्ये डॉ.सिल्कवर्थ यांचेकडे डमिट होते. तेंव्हासुद्धा एबी टी.दवाखान्यात येऊन ती धार्मिक तत्वे बिलपुढे मांडून निघून जातात.त्यामुळे बिल यांचा अहंकार व हटवादीपणा संपुष्टात येतो.त्यांना प्रचंड निराशा येते.त्याक्षणी बिल अचानक जोरात ओरडले की, एबी टी.कडे जे आहे ते मला प्राप्त होण्यासाठी माझी काहीही करावयाची तयारी आहे. ईश्र्वराने यासाठी मला मदत करावी .क्षणार्धात शुभ्र प्रकाशाने हॉस्पिटल लख्ख प्रकाशमय झाले.मी पर्वतावर उभा आहे,चैतन्याची झुळूक त्यांना जाणवली.मी मुक्त माणूस आहे.असा विलक्षण विचार मनामध्ये विजेसारखा चमकला.परंतु काही क्षणात तीअत्यानंदाची भावना हळूहळू ओसरली. त्यावेळी बिल बिछान्यावर होते. जाणिवेच्या नव्या जगात परमेश्र्वराचे अस्तित्व आहे. त्या विश्र्वाशी एकरूप होऊन मन शांत झालं होते. थोड्यावेळात आधुनिक शिक्षणाने बिलच्या मनाचा ताबा घेतलाआणि मी वेडा झालो की काय?असे बिल यांना वाटू लागले. हा चित्तथरारक अनुभव बिल डब्लू यांनी डॉ.सिल्कवर्थ यांना ऐकविल्यानंतर डॉ. सिल्कवर्थ म्हणाले की, हा वेडेपणा नाही,भासअवस्थाही नाही तर हा एक आत्मिक अनुभव आहे.कदाचित यातून तुमची दारूची समस्या सोडविली जाईल.असा आत्मविश्र्वास डॉक्टरांनी बिल यांना दिला.बिल यांनी डॉ. सिल्कवर्थ यांचे ऋण व्यक्त केले.त्याचवेळी एबी टी.यांनी आणून दिलेले मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स यांचे धार्मिकअनुभवांचे विविध प्रकार (व्हरायटी ऑफ रिलीजीयस एक्सपीरियन्सेंस) हे पुस्तक बिल यांनी वाचून काढले. संपूर्ण पराभव झालेल्या व्यक्तींनाच परिवर्तनाचे अनुभव येतात या सिद्धांताची अनुभूती आली. १९३४ पासून बिल डब्लू दारूपासून दूर झालेत.आणि पुढील ६ महिने त्यांनी हा संदेश देण्याचे अफाट काम केले.त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या मद्यमुक्तीला अर्थ प्राप्त झाला होता.डॉ.सिल्कवर्थ यांनी बिल यांना पुन्हा जाणीव करून दिली की, मद्यपाश आजाराबद्दल वैद्यकीय सत्य आणि लक्षणे हे देखील संदेश देतांना सांगितले पाहिजे.त्यामुळे मद्यपीडितांना स्वतःची ओळख पटण्यास मदत होईल.मे १९३५ मध्ये बिल डब्लू कंपनीच्या कामानिमित्त क्रॉन येथे गेले असतांना त्यांच्या मद्यासक्त मनाला दारूच्या विचाराने घेरले. हा विचार त्यांना भीतीदायक वाटला.परंतु पुढच्या क्षणीच अन्य मद्यपीडिताची भेट घेऊन अनुभवकथन केलं तर स्वतःचा बचाव होऊ शकतो असा विचार प्रकर्षाने बिल यांच्या मनामध्ये आला.आणि त्यांनी पीडितांची चौकशी करण्यासाठी फादर वॉल्टर टंक यांना फोन केला.फादर मार्फत हेनरिटा यांचेशी संपर्क झाला.हेनरीटा यांनी मद्यपी डॉ.बॉब यांच्या पत्नी नी यांचेशी चर्चा केलीआणि दुसऱ्या दिवशी नी व डॉ.बॉब दोघेजण हेनरीटा यांच्या घरी आलेत. डॉ.बॉब यांनी बिल डब्लू यांना चर्चेसाठी केवळ १५ मिनिटे दिले होते.परंतु त्यादिवशी एक चमत्कार घडला की,त्या दोहोंच्या रंगलेल्या चर्चेत रात्रीचे ११ वाजलेत हे त्यांना कळलच नाही.त्या भेटीत बिल डब्ल्यू यांनी डॉ.बॉब यांना उपदेश,सल्ला न देता स्वतःचे सत्यअनुभव,मद्यपाशआणि मद्यासक्तीची माहिती दिली.या प्रदीर्घ चर्चेत डॉ.बॉब असे म्हणालेत की, माझी भाषा बोलणारा पहिला माणूस आज मला भेटला कारण ती हृदयाची आर्त भाषा होती. १० जून १९३५ पासून डॉ.बॉब यांनी मद्यपान थांबवले.ही अभूतपूर्व भेट दोघांच्या दृष्टीने यशस्वी ठरली. म्हणून १० जून हा दिवस अल्कोहोलिक्स नॉनिमसचा स्थापना दिवस म्हणून जगभर पाळला जातो.वैद्यकीय शास्त्र,धर्मशास्त्र आणि मद्यासक्तांचे अनुभव याच्या मिश्रणाच्या जोडीला परस्परांची गरज ही संकल्पना उदयाला आली. पुढे या उपायातून पहिल्या १०० मद्यमुक्त झालेल्या सभासदांनी १९३९ मध्ये बिग बुक हे पुस्तक लिहिले आणि संघटनेचेच नाव या पुस्तकाने धारण केलेले आहे.

दारूने मिळणाऱ्या आनंदापेक्षाही श्रेष्ठप्रतीचा आनंद प्राप्त होईल अशी प्रभावी योजना आमलात आणणे हाच दारूचे आकर्षण तोडण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.या संघटनेच्या तत्वांच्या आचरणातून तशी जीवन पद्धती आज साकार होत आहे.मद्यपींच्या व्यक्तिमत्वामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडविणे हे ए.ए. संघटनेचे अंतिम उद्दिष्ट आहे.अन्य लोकांच्या दुःखात मदत करतांना स्वतःचे दुःखांना विसरण्याची संधी मिळाली नसती तर आम्ही नष्ट झालो असतो हाच अल्कोहोलिक्स नॉनिमसच्या सूत्राचा मूळ गाभा आहे.

या अलौकिक संघटनेच्या स्थापनेस १० जून रोजी ९१ वर्षे पूर्ण झालेलेआहेत.म्हणून संघटनेच्या या कार्यास मनःपुर्वक शुभेच्छा व्यक्त करून पुढील उज्वल वाटचालीस अगणित शुभकामना देतो..!!.

# किल्ले-धारूर न्यायालय परिसरात जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण



**किल्ले धारूर/प्रतिनिधी** : किल्ले धारूर येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय परिसरामध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश मा एन.एम.वाली साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच किल्ले धारूर न्यायालयातील सरकारी वकील ड.एस.एन.थेरोकार यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले,याप्रसंगी किल्ले धारूर वकील संघाचे अध्यक्ष ड. पी.पी. शिनगारे व वकील संघाचे सर्व पदाधिकारी हे उपस्थित होते तसेच हे वृक्षारोपण विविध झाडाचे यामध्ये चिंच,आंबा,पेरू व जांभळं यांचे वृक्षारोपण केलेले आहे. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी झाडाची काळजी घेतली जाईल असे सांगितले. या जागतिक पर्यावरण दिनी किल्ले धारूर न्यायालयातील ड.निंगुळे,ड.अहंकारे, ड.गडदे,ड. नखाते, ड. युवराज फुन्ने,ड.ईखे, ड.भोसले यांच्यासह कर्मचारी होळंबे,मुंडे,मस्के,पटाईत, शिपाई माने, अन्सार मामू आदी या प्रसंगी उपस्थित होते.

# गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक - बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुलामगिरी ग्रंथाच्या १५३ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ निग्रोंना का अर्पण केला असावा? या ऐतिहासिक व समकालीन विषयावर आयोजित १७३ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या प्रारंभीच अमेरिकेतील सदाचारी लोकांनी गुलामांना दास्यत्वातून मुक्त करण्यासाठी दाखविलेल्या औदार्य, निरपेक्षता आणि परोपकारबुद्धीचा गौरव केला आहे. त्यांच्या सन्मानार्थ हा ग्रंथ अर्पण करण्यात आला असून, भारतीय शूद्र-अतिशूद्र समाजालाही गुलामगिरीविरोधी संघर्षाची प्रेरणा मिळावी



हा त्यामागील उद्देश होता.

मेश्राम पुढे म्हणाले की, गुलामगिरी स्वीकारल्याने माणसाचे सद्गुण नष्ट होतात, असे होमर यांनी नमूद केले आहे. याच पार्श्र्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, तो बंड करून उठेल' असा विचार मांडला. अमेरिकेत रंगभेदाच्या स्वरूपात तर भारतात जात आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून गुलामगिरीची पाळेमुळे रुजलेली आहेत. या व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि पुढे सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी करून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. त्यामुळे गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी महात्मा फुले यांचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्घाटनपर भाषणात प्रा. शिवम गायकवाड यांनी प्राचीन काळातील अत्याचारांची उदाहरणे देत गुलामगिरीची भीषणता स्पष्ट केली. जगातील इतर गुलामगिरीच्या तुलनेत भारतातील जातीय गुलामगिरी अधिक भयावह असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख वक्ते ॲड. धनेश गवळी यांनी भारतीय समाजव्यवस्थेवर गुलामगिरी ही एक घातक कीड असल्याचे सांगितले. समाज परिवर्तनासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये बंडाची वृत्ती निर्माण करून अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी समन्वयक विलास रामटेके यांनी दीर्घकाळाच्या शोषणामुळे सामाजिक गुलामगिरी कशी बळकट झाली यावर भाष्य केले. ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी कष्टकरी वर्गाच्या श्रमांवरच जगाची उभारणी झाल्याचे सांगत स्वातंत्र्यानंतरही बहुतांश जनता विविध प्रकारच्या गुलामगिरीत जीवन जगत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच फोडा आणि राज्य करा या राजकारणामुळे लोकशाही व शिक्षणव्यवस्था धोक्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विकास खंदारे यांनी अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता वाढविणाऱ्या व्यवस्थेला तिलांजली देऊन वैज्ञानिक व सामाजिक विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. राज गायकवाड यांनी धार्मिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त होण्याची गरज व्यक्त केली, तर ॲड. डी. बी. मेश्राम यांनी मानसिक गुलामगिरीचे अस्तित्व अधोरेखित करून मानसिकतेत परिवर्तन घडविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी केले.

# समाजपरिवर्तनासाठी समाजकार्य शिक्षण महत्वाचे आहे : माझा अनुभव आणि आवाहन

बीएसडब्ल्यू (Bachelor of Social Work) म्हणजे समाजकार्याचे शिक्षण - जे केवळ विद्यार्थ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवत नाही, तर समाजाच्या सकारात्मक परिवर्तनासाठी एक प्रभावी साधन ठरते.

बारावीनंतर कोणत्याही शाखेतील विद्यार्थी या अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ शकतो. समाजकार्य हे एक शास्त्र आहे, जे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिक अनुभव देतं. फिल्डवर्क हा या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. वर्गात शिकवले जाणारे तत्त्व, संकल्पना आणि कौशल्ये प्रत्यक्ष समाजात उतरवून कसे वापरायचे, हे विद्यार्थी प्रत्यक्ष क्षेत्रात शिकतात. हे शिक्षण समाजाच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

समाजकार्य शिकताना विद्यार्थी विविध विषयांशी जोडले जातात - जसे की मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण, कायदे आणि संशोधन. हे ज्ञान केवळ त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी उपयुक्त ठरत नाही, तर समाजातील अंधश्रद्धा, रूढी, अनिष्ट प्रथा, विषमता यावर काम करण्यासाठी सक्षम करते. समाजकार्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानवतावादी दृष्टिकोन विकसित होतो. हे शिक्षण सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करतं. समाजाच्या उन्नतीसाठी, शाश्र्वत विकासासाठी आणि नवे बदल घडवून आणण्यासाठी इडथ एक प्रभावी शैक्षणिक पर्याय ठरतो. करिअरच्या दृष्टीनेही BSW विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध करतो -

CSR (Corporate Social Responsibility), NGOs, हेल्थ सेक्टर, महिला व बालविकास संस्था, शिक्षण संस्था, मानसिक आरोग्य क्षेत्र, शासनाची समाजकल्याण योजना, इत्यादी.

या सगळ्याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे. मी गणेश माधव चव्हाण - महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर येथून BSW पूर्ण केलं आहे. त्यानंतर MSW (Master of Social Work) मुंबईतील College of Social Work, Nirmala Niketan येथून पूर्ण केलं. आज मी Connect For Mumbai या येथे Associate - Operations म्हणून कार्यरत आहे.

हे सर्व शक्य झालं ते समाजकार्याच्या शिक्षणामुळेच. माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात झालेला बदल हे शिक्षणच घडवून आणू शकलं. म्हणूनच मी माझा व्यक्तिगत अनुभव शेअर करून सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करतो की, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर हे समाजकार्य क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. ज्या विद्यार्थ्यांना समाजासाठी काहीतरी करायचं आहे, समाजातील समस्या समजून घ्यायच्या आहेत, आणि स्वतः चं करिअर घडवायचं आहे, त्यांनी या संस्थेमध्ये BSW मध्ये प्रवेश घ्यावा.

हे शिक्षण तुमचं जीवन बदलू शकतं, आणि तुमच्या हातून समाजही बदलू शकतो.

**चव्हाण गणेश माधव**



MSW - College of Social Work Nirmala Niketan, Mumbai

Connect For Mumbai - (Associate - Operations)

माजी विद्यार्थी - महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर

माजी विद्यार्थी परिषद सचिव & amp; माजी समाजकार्य मंडळ सचिव

# सोनीजवळा-बोबडेवाडी पांदन रस्ता तात्काळ खुला करावा- शेतकऱ्यांची मागणी

## रस्ता खुला न केल्यास आत्मदहन करण्याचा शेतकऱ्यांचा प्रशासनास इशारा

**केज/प्रतिनिधी** : केज तालुक्यातील सोनीजवळा येथून बोबडेवाडी कडे जाणारा सोनीजवळा-बोबडेवाडी हा पांदन रस्ता तात्काळ खुला करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.जर सोमवार रोजी दुपारपर्यंत सदरील रस्ता खुला न केल्यास भूमि अभिलेख कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा लोकप्रतिनिधी सह शेतकऱ्यांनी प्रशासनास दिला आहे.



सोनीजवळा ते बोबडेवाडी पांदण रस्ता हा मागील दीड ते दोन वर्षापासून खुला करावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. परंतु भूमि अभिलेखच्या गलथान कारभारामुळे व कर्मचाऱ्यांचे वेळकाढू धोरणामुळे हा रस्ता वारंवार खुला करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे असा आरोप शेतकरी व ग्रामस्थांनी नायब तहसीलदार अशोक भंडारे यांच्याकडे केला आहे. शुक्रवार दिनांक ५ जून २०२६ रोजी सदरील रस्ता हा खुला करण्यासाठी केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे, मंडळ अधिकारी हजारे, तलाठी कवडे मॅडम यांच्यासह युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी हे सोनीजवळा हजर राहिले यावेळी त्यांच्या समवेत सरपंच गोविंद ससाने व तंटामुक्ती अध्यक्ष शंकर ससाने, आंबा साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पठाण यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. परंतु भूमि अभिलेख कार्यालयाचे दोन भूमापक कर्मचारी हे उपस्थित न राहिल्यामुळे सदरील रस्ता खुला करण्याची कारवाई करता आली नाही. सध्या पावसाळा जवळ आलेला आहे शेतकऱ्यांना पेरणी करण्यासाठी शेतामध्ये जाता येत नाही यामुळे शेतकरी आक्रमक झाले होते शेतकरी व ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी यांनी नायब तहसीलदार अशोक भंडारे यांच्याकडे तीव्र रोष व्यक्त करून भूमी अभिलेख कार्यालयाच्या कामकाजावर प्रश्न निर्माण केला आहे. यावेळी नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी मार्ग काढत भूमि अभिलेख कार्यालयाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून चर्चा केली. नायब तहसीलदार भंडारे यांनी सोमवार रोजी दुपारी ३-०० वाजेपर्यंत रस्ता खुला करून देतो असे आश्र्वासन लोकप्रतिनिधी व शेतकरी आणि ग्रामस्थांना दिले आहे. लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी नायब तहसीलदार भंडारे यांच्या समवेत चर्चा करताना सांगितले की, जर सोमवार रोजी दुपारपर्यंत सदरील रस्ता आपण खुला न करून दिल्यास आम्ही ग्रामस्थ व सर्व शेतकरी मिळून भूमी अभिलेख कार्यालयाच्या समोर आत्मदहन करणार आहोत असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

> काल शुक्रवार रोजी सोनीजवळ ते बोबडेवाडी रस्ता मोकळा करण्याच्या कारवाही करता आम्ही पोलीस प्रशासनासह हजर झालो होतो परंतु भूमि अभिलेख कार्यालयाचे दोन भूमापक अधिकारी, कर्मचारी हजर न राहिल्यामुळे सदरील रस्ता खुला करण्याची कार्यवाही करता आली नाही. सोमवार रोजी सदरील रस्ता खुला करण्याची कारवाई कामी हजर राहण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयास पत्र काढणार आहे.
>
> **नायक तहसीलदार अशोक भंडारे**

# आरबीआयकडून रेपो रेट जैसे थे; महागाई वाढण्याची भीती, कर्ज महाग होणार नाही

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) नवीन आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या बैठकीत रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. या निर्णयामुळं सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेपो रेट कायम ठेवल्यानं कर्ज महाग होणार नाही आणि हप्त्यांमध्ये (ईएमआय) वाढ होणार नाही. याशिवाय, २०२७ साठीचा महागाईचा अंदाज ४.६ टक्क्यांवरून ५.१ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे.



आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ५ जून रोजी ही घोषणा केली.

धोरणात्मक दर ५.२५ टक्क्यांवर कायम - वाढत्या जागतिक अनिश्चिततेचे कारण देत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने (एमपीसी) सलग दुसऱ्यांदा धोरणात्मक दर ५.२५ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जगात सुरु असलेल्या विविध युद्धांमुळं अनिश्चिततेचं संकट आहे. त्या पार्श्वभूमीवर आरबीआयनं थोडाफार दिलासा दिला आहे.

जीडीपी वाढीचा अंदाज कमी - पश्चिम आशियामधील सध्याचा तणाव आणि पुरवठा साखळीतील व्यत्ययांमुळं आरबीआयनं आपला जीडीपी वाढीचा अंदाज कमी केला आहे. चालू आर्थिक वर्षासाठी (आर्थिक वर्ष २०२७) जीडीपी वाढीचा अंदाज ६.९ टक्क्यांवरून ६.६म पर्यंत कमी करण्यात आला आहे.

महागाईबाबत चिंता - आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, सध्या किरकोळ महागाई निर्धारित मर्यादेत असली तरी, जागतिक तणावामुळं वाढणाऱ्या इंधन आणि ऊर्जा किमती भविष्यात किरकोळ बाजारावर आणि सर्वसामान्यांच्या खिशावर ताण आणू शकतात. त्यामुळं येत्या काळात महागाई वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

सेवा क्षेत्राला चांगले दिवस - सकारात्मक बाब म्हणजे देशांतर्गत आर्थिक घडामोडी मजबूत आहेत. उत्पादन आणि सेवा क्षेत्र चांगली कामगिरी करत आहेत, आणि जीएसटी सुसूत्रीकरण व स्थिर रोजगारामुळं शहरी भागांतील उपभोगाला आधार मिळत आहे.

# जनगणना २०२६-२७ बाबतीत पूर्व प्रसिद्ध प्रशासकीय अधिकारी इ झेड खोब्रागडे यांचे मार्गदर्शन

के. रवि (दादा)

नागपुर : भारतीय प्रशासन सेवेतील पूर्व प्रसिद्ध IAS अधिकारी ई झेड खोबरागड़े भाप्रसे नि संविधान फाऊंडेशन, नागपूर यानी की जनगणना २००२६ -२७ बाबत देशाला समाजाला प्रमाणित पणे मार्गदर्शन केले आहे.

जनगणना २०२६-!२७ करण्यासाठी प्रगणकांना प्रशिक्षण देणे त्यांनी सुरू केलं आहे. ज्यात पहिला टप्पा घराची यादी करणे, हाऊस लिस्टिंग आणि दुसरा टप्पा व्यक्तिगत माहिती घेणे. जी माहिती ऑनलाईन घेतली जाईल. प्रगणक घरी येतील व माहिती विचारतील.

ई झेड खोबरागड़े हया बाबत मार्गदर्शन करतांना म्हणतात की आपण प्रामुख्याने तीन प्रश्र्नांची उत्तरे भावनिक न होता सरळ सरळ दिली पाहिजे. १) जातीच्या रकान्यात वर्गवारी (category) विचारल्यास अनुसूचित जाती (SC) सांगावे. धर्म येथे सांगू नये. सांगितले तर धर्माची नोंद होणार नाही कारण हा जातीचा रकाना आहे. भावनिक होऊन धर्म बौद्ध सांगितला तर जातीच्या रकान्यात जातीची नोंद न होता इतरची नोंद होईल. त्याचा काहीच फायदा होणार नाही, तै निरर्थक ठरेल. २) अनुसूचित जाती सांगितल्यावर जातीच्या रकान्यासाठी पुन्हा जात विचारली जाईल, ५९ जाती लिस्टमध्ये येतील. पैकी महार सांगावे. धर्म सांगू नये. ३) धर्माच्या रकान्यात धर्म बौध्द सांगावे. ४) आपण सांगितलेली माहिती सांगीतल्या प्रमाणेच नोंदवलेली गेली याची खात्री करावी. यासाठी की आपण जे सांगतो ते कधीकधी जशाची तशी नोंदवली जात नाही. कारण आपण बौद्ध सांगितले तर हिंदू लिहण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून खात्री करणे आवश्यक आहे. ५) ही व्यक्तिगत माहिती गोपनीय असते, कधीही सार्वजनिक केली जात नाही. ६) जनगणना पूर्ण झाली की जात निहाय धर्मनिहाय आणि इतर बाबींची टोटल आकडेवारी जाहीर केली जाते.

जनगणनाची आकडेवारी नियोजन, बजेट, योजना, आरक्षण (शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय शींल), अत्याचार प्रतिबंध, उपवर्गीकरण साठी उपयोगी ठरणार आहे. लोकसंख्येचे आधारावर संविधानिक लाभ व सेवा सवलती मिळत असतात. सकारात्मक दृष्टिकोण से आवश्यक आहे. त्या करीता उत्तरे सरळ सरळ द्यावीत.

१) तुम्ही कुठल्या वर्गाचे आहात?

उत्तर- SC (अनुसूचित जाती)

२) तूमची जात काय?

उत्तर- महार

३) तूमचा धर्म कोणता?

उत्तर- बौध्द

कृपया लक्षात घ्या- बौध्द हा धर्म आहे; जाती संवर्ग किंवा जात नाही.



सदर माहिती आणी प्रश्र्नावली चर्चे अंती व जनगणना मधील लोकांशी चर्चा करून तयार केली आहे. दर वेळी आपण धोरणात्मक बाबीत भावनीक होतो. जर धोरणात्मक क्लच केला जात असेल, तर धोरणात्मक उत्तर घेवुनच आपण पुढे निघायला हवं. आणी तसंही हा डेटा ( विदा ) फक्त सांख्यिकीय स्वरूपात सार्वजनिक करने होतो. माहिती अधिकार किंवा उच्च न्यायालया मधे पण हा मागता येत नाही. करिता संख्या जर पुढील आधार असेल तर संख्याची निगा राखणे हे करणं आपलं काम आहे. आरक्षण आणी इतर धोरणात्मक बाबी साठी हे कर्तव्यबध्य आहे.

सेवानिवृत्ति नंतर तसेच स्वेच्छा निवृत्ति नंतर अन्य सवेनिवृत्त सरकारी अधिकारी परिवारा सहित देश विदेशात मजा मारतात.

परंतु हे जे ई झेड खोबरागड़े सारखे अधिकारी निःशुल्क करीत ते अभिमानास्पद आहे.

# लातूर वृक्ष चळवळीला चिमुकल्यांनी दिला नवांकुर!

## पर्यावरण दिनी दहा हजार झाडांचा १० वा वाढदिवस थाटात

**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिकासह ५२ संस्थानी एकत्र येऊन जी लातूर वृक्ष चळवळ उभी केली, या चळवळीने लातूर शहरात २०१६ साली जी १० हजार झाडे लावली त्या झाडांचा दहावा वाढदिवस साजरा करण्यात आला. आणि निसर्ग वाचला तरच आपण वाचू असा संदेश दिला. लातूर वृक्ष, स्टीम एज्युकेशन, सह्याद्री देवराई, माझं घर या संस्थाच्या वतीने औसा रोडवरील स्टीम एज्यूकेशन संस्थेच्या आवारात ५ जून रोजी चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून, आदर्श कॉलनी पर्यंत वृक्षदिंडी काढून, तसेच माझं घरच्या विद्यार्थ्यांनी प्रदूषण विरोधी संदेश देत बुधोडा ते लातूर सायकल रॅली काढून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या बोबड्या भाषेत झाडांचे महत्व सांगून लातूर वृक्ष चळवळीला एक नवा अंकुर दिला.

या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध अभिनेत्री नम्रता गायकवाड उपस्थित राहणार होत्या. मात्र काही कारणास्तव येऊ शकल्या नाहीत. १५ जुलै च्या नंतर त्या येणार आहे. त्यांनी व्हिडीओ संदेश देऊन शुभेच्छा दिल्या आहेत.

लातूर वृक्ष चळवळ व सह्याद्री देवराईच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रमांनी दिवसभर वातावरण निर्मिती केली. सकाळी स्टीम एज्युकेशन, पाटील प्लाझा जवळ, औसा रोड येथे शालेय मुलांच्या उपस्थितीत १० हजार झाडांचा वाढदिवस साजरा झाला. त्यानंतर आदर्श कॉलनी ते स्टीम एज्युकेशनपर्यंत लहान मुलांची वृक्ष-पर्यावरण दिंडी काढण्यात आली. 'माझं घर' प्रकल्पातील मुलं बुधोड्याहून सायकल रॅली काढत लातूरमध्ये दाखल झाली. या वयातही पर्यावरणप्रेम जागवणाऱ्या जिजा पाटील या चिमुकलीने 'माझ्या आंब्याच्या झाडाची कथा' सादर केली. स्वतः खाल्लेल्या आंब्याच्या कोयीपासून रोप तयार करून तिने तयार केलेल्या झाडाची ही हृद्य गोष्ट सर्वांना भावली. शेकडो महिला भगिनींच्या सहभागाने औसा रोडवरील स्टीम एज्युकेशनच्या पाठीमागील ग्रीन बेल्टमध्ये ऑक्सिजन झोन निर्मितीचा शुभारंभ करण्यात आला. ताम्हण, वड, पिंपळ, कडुलिंब अशा स्थानिक २५ झाडांचे प्रतिनिधिक वृक्षारोपण झाले.

प्रास्ताविक करताना लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी दिवसभराच्या कार्यक्रमाची माहिती दिली. वातावरण बदलामुळे उष्णतेचे संकट वाढले असून, पाऊस पडल्याशिवाय मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण न करण्याचा सल्ला त्यांनी दिला. याचवेळी लातूर कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी संजीवनी बेटावर दुर्मिळ वनस्पती ओळख, बीज संकलन व प्लास्टिक निर्मूलन अभियानासाठी रवाना झाले. कार्यक्रमाला नगरसेविका स्वाती घोरपडे, डॉ. नीलम पन्हाळे, स्टीम एज्युकेशनचे ओमप्रकाश झुरळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बी आर पाटील, श्रीकांत करवा, शरद झरे, ॲड. बालाजी इंगळे, लातूर मनपाचे उद्यान विभाग प्रमुख



समाधान सूर्यवंशी, कलीम शेख, अमृत सोनवणे, रितेश चापसी, नेताजी जाधव, धवल मशरू, महेश बिडवे, कल्पना झुरळे, मुख्याध्यापिका अंजू व्यास, उमा माने, गौरी देशमुख, प्रियांका झेरिकुंटे, अक्षय पंचाक्षरी यांच्यासह लातूर वृक्ष चळवळ, सह्याद्री देवराई, स्टीम एज्युकेशन, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, सह्याद्री देवराई हासेगाव, माझं घर बुधोडा व लातूर शहर महानगरपालिकेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मृत मराठा आंदोलकांच्या वारसांना प्रत्येकी १० लाखांची मदत

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३४ व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते. अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मृतांच्या वारसदारांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा प्रश्न उपस्थित केला होता.

यासंदर्भात मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही दिली होती. राज्य सरकारने मागील दोन दिवसांत केलेल्या कार्यवाहीमुळे विविध जिल्ह्यांतील एकूण ३४ मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपये, याप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांची मदत तातडीने मंजूर केली आहे. यामध्ये बीड जिल्हयातील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूर १ अशा वारसांचा समावेश आहे, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांनी दिली. आंदोलनादरम्यान सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता तातडीने करण्यात येत आहे. उपसमितीच्या बैठकीत सर्वच मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली असून, त्यावर वेगाने कार्यवाही सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आज मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी-अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

परळ बसस्थानकातील या कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीच्या सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेली ही राज्यव्यापी स्वच्छता मोहीम प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, आनंददायी आणि समाधानकारक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

प्लास्टिक पिशव्या व बाटल्यांचे पुनर्वापरासाठी संकलन

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करून त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून विविध टिकाऊ व उपयुक्त उत्पादने तयार करण्यात येतील, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, स्वच्छता ही एकदिवसीय मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाणार असून स्वच्छतेच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यात येईल तसेच प्रवाशांकडून मिळणाऱ्या सूचना आणि अभिप्रायांनाही प्राधान्य दिले जाईल.

विस्तारित चार्जिंग केंद्राचे भूमिपूजन

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने आपल्या सर्व २५१ आगारांमध्ये ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार परळ आगारात विस्तारित नऊ चार्जिंग केंद्रांच्या उभारणीचे भूमिपूजन मंत्री सरनाईक यांच्या हस्ते झाले.

यावेळी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, विभागीय नियंत्रक, कर्मचारी प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सरनाईक यांनी परळ बसस्थानक परिसर, प्रवासी प्रतीक्षागृह, प्रसाधनगृहे आणि इतर सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.

## महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाण्यांचे वितरण; शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावेत -कृषी मंत्री भरणे

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे.

योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल



बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यातील शेतकऱ्यांना वेळेत आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी विभागाने महाडीबीटी पोर्टलवरून बियाणे वितरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे बियाणे वाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि वेग येणार आहे. शेतकऱ्यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा.

ते म्हणाले, खरीप हंगामाच्या पार्श्र्वभूमीवर शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवस्थेच्या माध्यमातून कृषी सेवा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन खरीप हंगामाची तयारी वेळेत पूर्ण करावी.

महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin/AgriLogin या संकेतस्थळावर जाऊन बियाणे वितरण, प्रात्यक्षिके, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या शीर्षकाअंतर्गत अर्ज करावेत. अर्ज प्रक्रियेसाठी ग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे आवश्यक आहे.

तसेच जास्तीत जास्त शेतकरी गटांनी पीक प्रात्यक्षिके या घटकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. प्रात्यक्षिके व बियाण्यांच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## बौध्द समाजातील उपवर्गीकरण

अ) सनदी अधिकारी,डॉक्टर्स/इंजिनिअर वगैरे
ब) प्रशासकीय अधिकारी/ राजपत्रित अधिकारी
क) तृतीय श्रेणी कर्मचारीवर्ग/ खाजगी कार्यालयाल कर्मचारीवर्ग
ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारीवर्ग/ कामगार /कष्टकरी वर्ग

ड वर्गातील बौध्द समाज साधारणपणे नॉन मॅट्रिक शासकीय कार्यालयात चपराशी खाजगी कंपन्यातील कामगार रिक्षा चालक भाजीपाला विक्रेता चाळीत लहान घरात राहणारा.आंबेडकरी आंदोलनात रस्त्यावर उतरणारा आपल्या मोहल्लयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जोरात जयंती साजरा करणारा,बाबासाहेब व संविधानाच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरून मोर्चात सहभागी होणारा गरीब कट्टर आंबेडकरवादी समाज. क वर्गातील बौध्द गरीब आईवडीलांच्या पोटी आलेला स्वत: BMC शाळेत सातवीपर्यंत शिक्षण घेतला पुढे कॉलैज पूर्ण करुन सरकारी सेवेत नोकरी करणारा आपल्या मुलांना इंग्लिश माध्यमातून शिक्षण देणारा ज्या गरीब वस्तीत जन्माला ती वस्ती सोडून ठाणे व बोरिवलीच्या पलिकडे वन बीएच के त राहणारा बायको नोकरी करणारी असेल तर टू बी एच के त राहणारा समाज व नातेवाईकांपासून आलिप्त राहणारा सुरक्षा कवच म्हणून बौध्द समाजाचा ग्रूप तयार करुन धम्मदेसना चे कार्यक्रम करणारा बौध्द समाज. ब वर्गातील बौध्द समाज हा क वर्गातील बौध्द समाजाची उत्क्रांती झालेला समाजा हा थोडाफार धनिक वर्ग ह्या धनिक वर्गातील मुलांनी आंतरधर्मीय विवाह करुन स्वत:चे स्वतंत्र संसार थाटलेला समाज ह्या ब वर्गातील बौध्द समाजाचे आई वडील ड वर्गातील लहान मोठ्या भावांच्या घरी राहतात.ब वर्गातील समाज कोणत्याही आंबेडकरी चळवळीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवात सहभागी होत नाही कधी जवळपासच्या बुध्द विहारात जात नाही.हा वर्ग प्रामुख्याने गोएंका गुरुजींनी शोध लावलेल्या विपश्यनेत गुरफटलेला समाज. अ वर्गातील बौध्द समाज हा सगळ्यात घातकी आणि खोटारडा समाज हा मोठ्या घरांत पॉश सोसोयटीत राहतो हा वर्ग धनाढ्य आहे.ह्या समाजाकडे स्वत:चे व मुलांचे दाखले महार असतात.ह्या समाजाकडे कधीही धर्मांतरीत बौध्द असे शासकीय दाखले नसतात. परंतु, भोळा भाबडा समाज अशा लोकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती समारंभात व्याख्याने द्यायला बोलावतो.ह्या वर्गातील व्याख्याता जो स्वत: हिंदू महार आहे तो भारत बौध्दमय झाला पाहिजे ह्यावर भली मोठी भाषणे देतो. सध्या अ व ब वर्गातील बौध्द समाज अर्थात महार समाज सर्वोच्च न्यायालयाने क्रिमीलेयर अट अनुसूचित



जातींना लावावी असे निरीक्षण नोंदवल्यांने प्रचंड भेदरून गेलेला आहे.आपल्या मुलांना अनुसूचित जातींच्या प्रवर्गातून परदेशात शिक्षण घेता येणार नाही सनदी अधिकाऱ्यांच्या परिक्षेत मागासवर्गीय म्हणून बसता येणार नाही.डॉक्टर इंजिनिअर होण्यासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतील, ह्या चितेने ग्रासलेले आहे.

शरद आढाव,९८३३१७५६६९,मुंबई.

०००००००००००००००००००००००००

## तृतीयपंथीयांच्या स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना २५ हजार ते २ लाखांपर्यंत आर्थिक साहाय्य

**मुंबई :** तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तृतीयपंथीयांच्या स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेद्वारे २५ हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या योजनेचा उद्देश तृतीयपंथीयांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे, आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देणे, कौशल्य विकासाला चालना देणे तसेच सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. यासोबतच सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणालाही या योजनेमुळे बळ मिळणार आहे. योजनेअंतर्गत तीन प्रकारच्या कर्ज योजनांचा समावेश करण्यात आला आहे. लघु कर्ज योजनेत २५ हजार रुपयांपर्यंत, मध्यम कर्ज योजनेत ५० हजार रुपयांपर्यंत तर दीर्घ कर्ज योजनेत २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे. प्रत्येक योजनेत लाभार्थ्याचा हिस्सा पाच टक्के, शासन अनुदान ४५ टक्के आणि बँक कर्ज ५० टक्के या प्रमाणात निधीची रचना करण्यात आली आहे. नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना तीन टक्के व्याज सवलतीचाही विशेष लाभ मिळणार आहे. या योजनेद्वारे भाजी स्टॉल, चहा व स्नॅक्स सेंटर, झेरॉक्स व लेमिनेशन सेंटर, फूड स्टॉल, पिठाची गिरणी, कापडी पिशव्या निर्मिती, स्टेशनरी दुकान, मिनी मालवाहतूक टेम्पो, जनरल स्टोअर्स, आईस्क्रीम फॅक्टरी, ज्यूस सेंटर, बेकरी, बांगडी दुकान, बटाटा वेफर्स निर्मिती, ब्युटी पार्लर, सलून, चिकन व मासे विक्री केंद्र, मोबाईल शॉपी, मसाले निर्मिती, लॉन्ड्री व्यवसाय तसेच प्लंबर, इलेक्ट्रिशियन, एसी, मोबाईल व घरगुती उपकरणे दुरुस्ती यासारख्या विविध व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध होणार आहे. योजनेसाठी अर्जदार महाराष्ट्रातील किमान १० वर्षांचा रहिवासी असणे आवश्यक असून त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. सक्षम प्राधिकरणाकडून जारी करण्यात आलेले तृतीयपंथीय ओळखपत्र, व्यवसाय करण्यास सक्षम असणे गरजेचे, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो तसेच व्यवसायाशी संबंधित आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. यापूर्वी इतर कोणत्याही बीज भांडवल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अशी अटही घालण्यात आली आहे.

ही योजना सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई शहर कार्यालयामार्फत राबविण्यात येत असून अधिक माहितीसाठी तालुका समन्वयक व्यंकटी तोगरे यांच्याशी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई शहर, प्रशासकीय इमारत भाग-१, चौथा मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००७१ येथे किंवा मोबाईल क्रमांक ८२९१७८८७५७ वर संपर्क साधावा. मुंबई शहरचे समाज कल्याण सहायक आयुक्त यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# लातुरकरांना मिळणार पर्यावरणस्नेही पिशव्या

### पर्यावरण दिनी प्रारंभ, आयएमएचा पुढाकार व्हेंडिंग मशीनचे लोकार्पण

**लातूर/प्रतिनिधी :** सृष्टीच्या रक्षणासाठी पर्यावरणाची जपणूक गरजेची असून पर्यावरणासाठी आव्हान ठरणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्यांना नाकारुन पर्यावरण स्नेही कापडी पिशव्या वापरणे ही काळाची गरज आहे. या कामी लातूर आयएमए सरसावली असून कापडी पिशव्या देणारी व्हेंडींग मशीन त्यांनी शहरात उपलब्ध करुन दिली आहे. जागितक पर्यावरण दिनाच्या औचित्यावर गंजगोलाईत या मशीनचे लोकार्पण जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व मनपा आयुक्त मानसी मिना यांच्या हस्ते झाले.

आयएम लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, खजिनदार डॉ. मन्सूर भोसगे, उपाध्यक्ष डॉ. मेघना गुगले, वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. श्वेता काटकर (पवार), सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी (अवस्थी),



सहसचिव डॉ. अब्दुल हमीद चौधरी, डॉ. महादेव बनसुडे, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. आनंद कलमे, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. सुरेश भट्टड, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. ज्योती धनगे, डॉ. विमल डोळे, उपआयुक्त वसुधा फड तसेच सन्मती मेस्त्री ,लातूर महानगरपालिकेत कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उपक्रम ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वर्षा दरडे यांच्या संकल्पनेतून साकारला आहे.

प्लास्टिकमुक्त लातूर हरित लातूर, स्वच्छ लातूर या संकल्पनेअंतर्गत आयएमएने लातूर शहरात तो सुरू केला आहे. गंजगोलाई परिसरात अनेक बाजारपेठा आहेत. इथे नेहमीच ग्राहकांची वर्दळ असते. बरेचजण प्लास्टिक पिशव्या वापरतात. त्याचे विघटन होत नसल्याने विविध समस्या निर्माण होत आहेत. ते टाळण्यासाठी व लातूर शहरातील वाढते प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. गंजगोलाईत कापडी पिशव्या सहज उपलब्ध व्हाव्यात हाही येथे मशीन लावण्या मागचा उद्देश असल्याचे आयएमएच्या वतीने यावेळी सांगण्यात आले. जिल्हाधिकारी बास्टेवाड, मनपा आयुक्त मानसी व अन्य मान्यवरांनी यांनी या उपक्रमाचे कौतूक करीत प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर वाढवावा, असे नागरीकांना आवाहन केले. आज कापडी पिशवीचा स्वीकार करा, उद्याचे पर्यावरण सुरक्षित करा हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

अशी मिळेल पिशवी

व्हेंडिंग मशीनवर युपीआय स्कॅनर दिले त्यावर दहा रुपये मोबाईलवरुन जमा करायचे. ते व्हॅलिड झाले की मशीच्या कप्पयात कापडी पिशवी आपोआप पडते तेथून ती घ्यायची. मशीनमध्ये एकाच वेळी तीनशे पिशव्या बसतात. ना नफा ना तोटा याअंतर्गत हा उपक्रम सुरू आहे. मशीनची किमंत सुमारे पन्नास हजार असून ती लातूर आयएमएच्या वतीने लातूर महापालीकेला देण्यात (डोनेट) आली आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यात ही एकमेव मशीन ठरली आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.